International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.065
Vol.7 No.4 Mar -Apr 2020

# साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील इतिहासाचे अवलोकन

**डॉ. किशोर नागनाथ जोगदंड**
**इतिहास विभाग प्रमुख**
**वसुंधरा कला महाविद्यालय, जुळे सोलापूर**

**प्रस्तावना :**

साहित्यसम्राट, लोकशाहीर तथा लोकलेखक अण्णाभाऊ साठे यांनी मराठी साहित्यात महत्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांनी आपल्या साहित्यातून समाजातील उपेक्षितांचे जीवन आणि जगण्याची धडपड वास्तवदर्शी रेखाटून, सामान्य माणूसाचा सुद्धा इतिहास असतो हे सिद्ध केले. त्याच्या व्यक्तीरेखा 'भूक' आणि माणसानेच माणसासाठी तयार केलेल्या 'चक्रव्यूहाशी' संघर्ष करताना दिसतात. स्वाभिमान, शिलाची जपणूक करतात. जे भोगले, जे दिसले, जे अनुभवले तेच त्यांनी लिहिले. म्हणजे त्यांच्या कथा सत्यावर आधारित आहेत, अर्थात इतिहास सत्यावर आधारित असतो.

इतिहासात माणसा-माणसात दडलेला आहे. म्हणजे इतिहासाची व्याप्ती प्रचंड आहे. माणसामाणसात दडलेला इतिहास शोधण्यासाठी इतिहासकाराची निरीक्षणशक्ती तीक्ष्ण असावी लागते. घटनांतील कार्यकारणभाव समजून घेऊन तर्कशुद्ध पद्धतीने सुसंगत वार मांडणी करावी लागते. घटनेला किंवा घटिताना व्यक्ती आपल्या प्रतिभेने घटना रंजीत बनवत असतो. अलंकारिक पणा किंवा रंजकपणा हा साहित्याचा मूळ गाभा असतो पण हा रंजकपणा इतिहासाला मान्य नाही. म्हणून काय साहित्यामध्ये इतिहास नाही असे आपल्याला म्हणता येणार नाही. साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य याच दृष्टीने बघणे आवश्यक आहे. त्यांच्या साहित्यात इतिहास दडलेला आहे म्हणून प्रतिभा, साहित्य आणि इतिहास याच्यातील सह-संबंधाचा याचा शोध घेण्याचा प्रयत्न शोधनिबंधात केला आहे.

**साहित्यातील विशेषतः वारणेच्या खोऱ्यात, चित्रा आणि फकीरा यातील सत्येतेविषयी अण्णा भाऊ साठे यांचे मत :**

अण्णा भाऊ साठे यांची पहिली कांदबरी 'वारणेच्या खोऱ्यात' इ. स. १९४८ प्रकाशित झाली. या कांदबरीविषयी ते लिहतात कि, "वारणा नदीच्या खोऱ्यात माझ्या आयुष्यातील बरेच दिवस मी घालवलेले आहेत. तो सुंदर खोरा मी अगदी जवळून पहिला आहे. त्या खोऱ्यात, त्या नदीकाठी,

मला जे जे दिसले, ते सारे एका सूत्रात ओवून त्याची एक कथारूपी माला गुंफून ती मराठी साहित्याच्या गळयात घालावी असे मला एकसारखे वाटत होते, पुढे म्हणतात, “आपण जे जीवन जगतो, ज्या जीवनात आपला आणि आपल्या कित्येक पिढ्यांचा जन्म झाला, त्या जीवनाचा आपण रोज अनुभव घेत आलो आहोत, तेच जीवन जगणारी बहुसंख्याक जनता, त्या जनतेचे विशाल जीवन, तिची जगण्याची धडपड, किंवा संघर्ष त्याच जनतेत वावरणारे उदात्त विचार हे सारे आपल्या लिखाणातून जनतेपुढे मांडावे अशाच मोहाने प्रेरित होऊन मी आज पर्यंत लिहीत आलो आहे.”

‘चित्रा’ कांदबरीच्या विषयी ते म्हणतात, चित्रा कादंबरी विषयी एका मित्राने अण्णाभाऊ ला विचारले की या कादंबरीत कल्पकता किती आहे आणि वास्तवता किती आहे यावर उत्तर देताना ते म्हणतात या भांडवली जगतात कल्पनेलाही लाजवणारी वास्तवता वावरत आहे. आपण या कादंबरीविषयी एक गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे ती म्हणजे अशी की चित्रा हे पात्र जीवनासाठी उदात्त प्रेमासाठी अनंत संकटाशी झुंजणाऱ्या जीवाच्या मुलाने शीलाचे रक्षण करणाऱ्या एक झुंजार स्त्रीचे चित्रण आहे.

अण्णाभाऊ ‘फकीरा’ कादंबरीच्या लेखकाच्या मनोगतात लिहतात कि, “प्रतिभेला सत्याचं, जीवनाचं दर्शन नसेल तर प्रतिभा, अनुभूती शब्द निरर्थक आहेत असा माझा अनुभव आहे कारण सत्याला जीवनाचा आधार नसला की प्रतिभा अंधारातील आरशाप्रमाणे निरुपयोगी ठरते...... जशी प्रतिभेला वास्तवाची गरज भासते, तद्वतच कल्पनेला ही जीवनाचे पंख असणे आवश्यक असते आणि अनुभूतीला सहानुभूतीची जोड नसेल तर आपण का लिहितो याचा पत्ताच लग्न शक्य नाही, मी जे पाहिलं, अनुभवलं, ऐकलं, तेच मी लिहिलं आहे" थोडक्यात प्रत्येक माणसाचा एक इतिहास असतो तो इतिहास त्याच्या अनुभवाचा दस्ताऐवजातून व्यक्त होतो.

**ऐतिहासिक बंडाची संकल्पना आणि समाजवाद :**

‘बंड’, उठाव, युद्ध, तह या बाबीशिवाय आपण इतिहासाची कल्पनाच करू शकत नाही. मुळात माणूस बंड का करतो? या कारणाचा प्राथमिक शोध घेतला असे लक्षात येईल कि, विषमता हे बंडाचे मूळ कारण आहे. वास्तव जीवनात जेव्हा त्याच्या स्वातंत्र्याची हक्काची, समाज स्वास्थ्याची व मूलभूत अधिकारांची गळचेपी होते त्यावेळी मानव समूह हा परिस्थिती विरुद्ध बंड करून उठतो आणि संघर्ष सुरू होतो४ वारणेच्या खोऱ्यातील भैरू म्हणतो, कोण लुटालुटी साठी, कोण पोटासाठी, कोण वाटीसाठी तर कोण लंगोटीसाठी बंड करतोय कुणाला स्वराज्य पाहिजे तर कुणाला शेतकरी राज्य पाहिजे आणि या सगळया भानगडी देवाला कशा कळणार ? तर नारू म्हणाला, कोणी का बंड करीना त्याला तरी काय पाहिजे असतं, पोटासाठी बंड करू नये तर काय करावे माणसाने ? असा प्रश्न व्यवस्थेला विचारतात.

**‘वारणेच्या खोऱ्यात’ला समाजवादी संवाद**

धोंडीबा म्हणतो, आज आमच्या जवळ जमीन नाही याचं कारण आम्ही आभाळातून पडलो आणि धरतीने झेललं असं म्हणता येईल का? आज तुमच्या जवळ जमीन आहे आणि माझ्याजवळ नाही पण आमच्या दोघांच्या बि मुळया पाताळाला भिडल्या हे विसरून चालणार नाही. तुम्ही जगात येताना आपल्या सोबत जमीन आणली होती आणि आम्ही विसरून आलो होतो असं कोण म्हणेल. त्यावर हिंदुराव म्हणाला, “आम्ही माणस आहोत आणि माणसा सारखं जीणं जगावं असं आम्हाला वाटतं म्हणून आम्ही बंड केल आहे, हे बंड बायाबापड्या विरुद्ध नाही किंवा गरीब लोकांविरुद्ध नाही आम्ही जनते विरुद्ध नाही म्हणूनच अजून जगलो आहोत जो जनतेवर जुलुम करतो त्याला जनतेच्या पोटात जागा मिळत नाही आम्हाला मात्र त्याची वाण नाही आज कित्येक दिवस आम्ही उघडे फिरतो आहोत जगात दोन प्रकारची माणसं आहेत. त्यातील एक जन्मभर काबाडकष्ट करून उपासमारीने जर्जर होऊन मरणारे व मरणानंतरही ज्यांना जळायला भरपूर जळण मिळत नाही ते आणि ज्यांना ऊन, पाऊस थंडी वारा काहीच ठाऊक नसतं ज्यांच्या पोटातलं पाणी सुद्धा चालत नाही जे आयतं बसून खातात आणि मरणानंतरही कापराच्या ढिगात जळतात ते दुसरे एक धनी धनवान म्हणून सुखात जगतो आणि कापरात जळतो,  तर एक चाकर दरिद्री म्हणून दुःखात जगतो आणि शेवटी जळणा शिवाय मारतो ज्या मूठभर लोकांच्या हातात सर्व जमीन आहे ते मालक आहेत तर कोटमाप लोकांच्या मालकीचं काहीच नाही फक्त खुरपं आणि दोरी एवढेच त्यांचा आहे आणि अशाच लोकांना जाण्यासाठी जवळ मिळत नाही असं असूनही काही लोक त्या शेतकऱ्याची शेतकरी राजा, जग पोसणार म्हणून कावेबाजपणाने तारीफ करतात. शेतकऱ्याची तोंडानं तारीफ करतात पण आपल्या फायद्यासाठी त्याला जमिनीवर घासून राबवून त्याचा रेंदा पाडतात.

आम्ही का लढावं हे आम्हाला समजलं आहे. कदाचित कसं लढावं हे समजलं नसेल पण आम्ही करतो ते चूक करतो असं मात्र मी कधीच म्हणणार नाही कारण पूर्वीही पुष्कळ बंड होऊन गेली आहेत. बंड झालं ते शेवटी फसलं परंतु त्या बंडात जे मरण पावले ते अमर झाले उमाजीनंही बंड केलं तेही फसलं पण त्या बहाद्दूर रामोशा च्या मर्दपणा ला सर्वच मानतात म्हणून आमची बहादुरी वाया जाणार नाही आमची लढाई कधीच थांबणार नाही जोपर्यंत जगात एक जरी मनुष्य उपाशी राहिल तोपर्यंत ही लढाई चालूच असणार. वारणेच्या खोऱ्यातला हिंदुराव गरीब-श्रीमंत हा भेद नष्ट करण्यासाठी बंड का केलं याविषयी प्रामाणिकपणानं आपली भूमिका विशद करतो आहे. यापुढे जाऊन तो असे म्हणतो बंडखोर माणूस मरणाला कधीच भीत नाही आणि जे बंडखोर नसतं ते भितं, ज्याला बंडखोर व्हायचं असेल त्यांनी नेहमी मरायला तयार असावं लागतं.

**चित्राची कथा आणि मुबईतील जीवनवाद**

‘चित्रा’ कांदबरीतील कथानकाविषयी अण्णा भाऊ साठे सांगतात, तरुणीचा जीवनावरचा दुर्दम्य विश्वास आपण साकार करू शकतो यावर मला मात्र विश्वास बसत नव्हता म्हणून मी मुका होऊन बसलो होतो. परंतु क्रमप्राप्त मार्गाने मानवतेची प्रगती होत होती खेड्यावरचा शेतकरी पोटासाठी मुंबईकडे पळत होता. साच्याची गरज म्हणून कामगार पुरवण्याचे महान कार्य भांडवली

दुनिया करीत होती त्याच प्रमाणे इथल्या श्रीमंताच्या चैनीच्या वस्तू म्हणून जो कच्चामाल इकडे येत होता त्यात तरुण मुलींची ही आवक होत होती सोन्या बरोबर शीलहि विकले जाते हे मला कळत होते. जीवन जगण्यासाठी काही तरुण उदात्त विचाराने प्रेरित होऊन लढत होते तर काही अति वाईट कर्मे करून जगत होते सर्वांची धडपड ही फक्त जगण्यासाठीच आहे याची मला जाणीव होती. डोहातील पाणी आटून जाताच माशाची तगमग होऊन ते तळ सोडून तरंगू लागताच कावळे त्यांना वेचून खातात त्याचप्रमाणे खेड्यावर उपासमारीने हैराण झालेल्या शेतकऱ्यांच्या मुली जेव्हा भुलतात तेव्हा शीलाचे व्यापारी त्यांना फसवून मुंबईत आणून विकून स्वतःची पोटे जाळतात असे माणूस रुपी कावळेही मी पाहिले आणि ही कथा लिहून काढली.

अण्णाभाऊ कादंबरीतील प्रसंग, घटना सत्यावर आधारित असल्यामुळे त्या प्रसंगाच्या सादरीकरणाला धार चढते, निसर्ग शब्दाच्या माध्यमातून आपल्यासमोर उभा राहतो. व्यक्तीचे वर्णन करताना व्यक्तिरेखेला साज चढवून त्याच्या मनातील भावनांचा कल्लोळाचा वेध मांडत असताना खऱ्या जीवनातील प्रसंग जसेच्या तसे वर्णन केले आहेत. थोडक्यात मानवी मनाचा ठाव घेण्यात अण्णाभाऊ यशस्वी झाले आहेत. 'माणसानं जळलं तसं तापावं' या त्यांच्या वाक्यात तत्वज्ञानाबरोबर 'जीवनवाद' ओतप्रोत भरला आहे.

**कशासाठी पोटासाठी, खंडाळ्याच्या घाटासाठी**

त्याकाळी लोक मुबईला पोट भरण्यासाठी जात असत तेव्हा अण्णा भाऊ लिहतात, इंजिन म्हणत होते जणु ते सांगत होते की आपण हे एवढे मोठे धूड घेऊन जे आज पळत आहोत येत्या खंडाळ्याच्या घाटासाठी आणि तो घाट फोडून ज्यांनी वाट केली त्यांच्या पोटासाठी आपण हे काम करीत आहोत आपल्यावर किती भारी कामगिरी आहे त्या विशाल डोंगरांचे सह्याद्रीचे पोट फोडून त्यांनी बोगदे केले ज्यांनी मुंबईत 1854 सालि गिरण्या सुरू केल्या त्यांच्या पोटासाठी आपण धावत आहोत जणू असेच ते ओरडून म्हणत होते आणि धुराचे काळे भोर लोट सोडीत धावत होते मधेच किंकाळत होते. जणू ते इंजिन त्या घाटात 1853 साली बोगदे पाडून त्याला वाट करून देणार त्या भांडवलशाहीचा जीव तोडून जयजयकार करीत होते आणि धावत होते आणि पुन्हा पुन्हा म्हणत होते कशासाठी पोटासाठी खंडाळ्याच्या घाटासाठी 103 एवढेच नाही तर, रोज सकाळी लोकांना उठविण्याचे काम करणारे ते परोपकारी प्राणीसुद्धा मुंबईला निघाले होते परंतु कामाला नव्हे की चैन करण्यासाठी नव्हे , तर एखाद्या हॉटेल वाल्याच्या हंडित डुंबायला आणि एखाद्याच्या पोटात गडप्प व्हायला.

मुंबई राज्यातील जनतेचा न्यायनिवाडा करणाऱ्या हायकोर्टाकडून जमा टांगा जात होता तेव्हा तेथील घोड्याकडे पाहून त्याबद्दल चित्राने आणि आपल्या मामाला विचारले, तेव्हा मामा अर्थात कृष्णा "ह्योच बघ तो काळा घोडा" पुढे अण्णाभाऊ त्याला अशी जोड देतात की आपल्या पाठीवर बसलेल्या इंग्रजी साम्राज्यशाहीच्या वारसा ऐवजी स्वतःच्याच नावानेच प्रसिद्धी पावलेला परंतु भारतात दोनशे वर्ष दृष्ट अंमल गाजवणाऱ्याला पाठीवर घेऊन जो तीनच पायावर उभा होता.

**फकीरा व गुन्हेगार जाती-जमाती कायदा ;**

अण्णा भाऊ साठे यांच्या निळू मांग या कथेत व फकिरां या कादम्बरीत गुन्हेगार जाती-जमाती कायद्या अंतर्गत हजेरीचा उल्लेख येतो. हा हजेरी प्रकार मातंग बांधवासाठी एक काळा अध्याय ठरला होता. ' वयात आलेल्या सर्व मांगाना आणि गावातील इतर गुन्हेगारांना तीन वेळ हजेरी लावण्याचा अधिकार पोलीस पाटील आणि कुलकर्णी याना देण्यात आला होता. अन यात कसूर झाली तर तीन महीने तुरुंगात सक्त मजुरी ! म्हणजे पाटील आणि कुलकर्णी हे या कायद्यानुसार गावपातळीवरचे प्रत्यक्ष अंमलदार होते. प्रातिनिधिक स्तरावर वाटेगावच्या मांगवाड्यातिल हजेरी वास्तव अण्णाभाऊनी भेदकपणे अभिव्यक्त केले आहे. तीन ते चार पिढ्यांनी जे भोगले त्यांच्या जखमावर आज आपण मलमपट्टी करू शकत नाही, पण आज आपण निदान त्या जाणू तरी शकतो की त्यावेळच्या त्या जखमांची दाहकता किती होती ते ! त्यानी या कायद्याचे घोर परिणाम आपल्या कथा कादम्बर्यात अगदी कौशल्ल्याने मांडले आहेत. फकिरा या कादम्बरी मधे नमुद केल्याप्रमाणे सावळा मांग यास याच कायद्याचा बडगा दाखवून वाटेगावहून थेट बेळगाव येथे स्थानबद्ध म्हणजे हद्दपार करण्यात आले आहे. मात्र तो हूकूम मात्र चिंतनीय आहे तो हूकूम असा - ' तुमच्या गावच्या मांग जमातीनं इंग्रजी हद्दीत शिरून जो उत्पात मांडला आहे, त्यामुळे शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी हा हूकूम रवाना होत आहे. थोडक्यात ' मांग जातींतील झुंजार व्रुत्ती नमावी, नाहीशी व्हावी, त्यानी लाचार व्हावे, हाच त्या कायद्याचा हेतु होता.' इंग्रजानी या कायद्याचा आपला फास इतका आवळुन टाकला, की मांग ही जात सांगणंही कठीन झाले होते. मांग म्हणाला की क्षमा नाही हा अंमलदार लोकांचा खाक्याच ठरला. फिरस्ते मांग स्वतःला मांग सांगण्याऐवजी जात चोरु लागले. कैक मांगाचे गारुडी बनले. महाराष्ट्राचा आदिवासी मांग इंग्रजानी तलवारीच्या धारेवर धरला. 'कादम्बरीतले हे वर्णन त्या विशिष्ठ कथानकाला धरून असले तरी त्या काळाचे हे जळजळित सामाजिक वास्तव होते हे विसरून चालणार नाही. ज्यानी पराकोटीची गुलामी स्वीकारली होती त्यांच्याप्रति या कायद्याने मवाळ धोरण स्वीकारले होते तर आपली स्वतःची माणूस म्हणून अस्मिता ज्यानी प्रकट केली त्यांना मात्र धारेवर धरले.

वाटेगावातील आपल्या गणागोतात चटणी भाकर खावून पण सन्मानाने आणि आनंदाने दिवस घालवु इच्छिणार्या कुटुम्ब वत्सल फकिराला आणि त्याच्या साथीदारांनाही या कायद्याने परागंदा व्हावे लागले. महाराष्ट्राचे कुलदैवत सह्याद्रीच्या कुशीत डोंगराच्या कीर्र झाडीत त्यांना आसरा घ्यावा लागला. एक महीना सह्याद्रीच्या डोंगरात राहिल्यावर दूरदूरचे मांग फकिराला येवून मिळाले. हजेरी देवून जगण्यापेक्षा लढून मरण्याचा त्यानी हिय्या केला होता. फकिरा स्वतःचे दुःख विसरून या हजेरी नावाच्या सामाजिक संकटात आणि त्याच्या उपचारांत गढून गेला. फकीराने एका महिन्यात कैक शिरजोराना धूळ चारली. त्या भागात जे अन्यायी मात्तब्बर होते त्यांना फकिराने जमीनदोस्त केले. फकीरासोबतचा एकूण एक जण अन्यायकारक कायदा करून हजेरी

लावली म्हणून सरकारविरुद्ध खड़े फोडत होता आणि या सरकारला कसा इंगा दाखवायचा याचा विचार फकिरा करीत होता.

एका प्रबळ सत्तेविरुद्ध बंड करणारा फकिरा जिवावर उदार झाला. ' बेडसगावात इंग्रज सरकारचा खजिना होता. भिवाकडून खजिन्याची ही बातमी ऐकली आणि सरकारला इंगा कसा दाखवायचा यावर फकिराला औषध सापडले. आणि तो म्हणाला, " चला तयारी करा ! त्यो खजिना मारूया. वाटेत वाघ उठला ,असं सायबाला वाटलं पाहिजे. लाव म्हणावं हाजरी, नि कर हतं राज ...." “आज आपण सरकारी खजिना फोडून -म्हंजी मरणाचं दारच फोडून यमराजाला भाईर काढणार हाय. खजिना लुटिची बातमी ऐकून सरकार पिसालून उठेल आणि परत आमास्नी त्यांच्या बरोबर लढावे लागेल.

यावरून फकिरांचा लढा हा निव्वळ हजेरीचा कायदा लादनार्या इंग्रज सत्तेविरूद्ध होता हे स्पष्ट होते. फकिरा म्हणतो, " सलामत ? कवा आमी सलामत होतो ? आईच्या पोटातनं भाईर आल्यापासनं- नव्हं, आईच्या पोटात व्हतो, तवापासनं रक्ताचं घोट घेतोय, लढतोय. आमी कवाच सलामत नव्हतो .." फकिराच्या ऊद्वेगाने केवळ त्याच्या वा त्याच्या पिढिच्या यातनांची दखल घेतली असे नव्हे तर, एकूणच अश्यप्रुशता , हजेरी कायदा यानी ज्या ज्या सामाजिक यातना कैक पिढयाना दिल्या त्याचा तो उद्वेग होता.

**निष्कर्ष :**

फकिराचि समाधी वाटेगाव येथे आहे. खजिना लुटला म्हणून या वीराना लुटारु म्हणून न पहाता गुन्हेगार जातीजमाती कायद्याविरोधी संघर्ष करणारे थोर भारतीय सुपुत्र म्हणून पहावे. त्यांच्या जीवन संघर्षाचे मोल व्हावे. शिवाय फकिरा या कादम्बरी कडे पहाण्याचा एक वेगळा द्रुष्टीकोन मी आपणा पुढे ठेवण्याचा प्रयत्न केला आहे .त्याचा योग्य विचार व्हावा. गुन्हेगार जाती जमाती कायदा किती भयंकर होता हे अण्णाभाऊच्या लेखणीतून आणि विशेष करून फकिराच्या शब्दातुन , फकिराच्या व निळू मांगाच्या जीवन संघर्षातून समजून घेवूया. यास स्वतंत्र विश्लेषनाची गरज नाही.फकिरा ही केवळ कादम्बरी नाही तर कलात्मक शैलीने लिहिलेला इतिहास आहे. सवर्णांनी मांगाप्रति नकारात्मक भूमिका, उपेक्षा ,हेटाळणी ,अश्यप्रुशता , गावगाड्यात आवश्यक असणारे स्वस्त कामगार ,साम्राज्यवादी इंग्रजांचे मांगामहाराच्या झुंजारव्रुत्ती विरोधी धोरण, इथल्या शोशकांची इंग्रजांशी असलेली हातमिळावू व्रुत्ती यातूनच या कायद्याची निर्मिती झाली आहे. मुक्ता आपल्या निबंधात म्हणते की, " मांगमहार हो तुम्ही रोगी आहात तुमच्या बुद्धीला ज्ञानरुपी औषध घ्या म्हणजे रातदिवस तुमच्या ज्या हजर्या घेतात त्या बंद होतील."

ती सात अती उग्र स्वरूप धारण करून इंच इंच जमीन व्यापीत पुढं-पुढं सरकत होती आणि गावात सात पसरताच भरला संसार जिथल्या तिथं टाकून लोक सैरावैरा पळत होते. जणू त्यांच्यासाठी

भयंकर वनवा लागला होता. जो पळत नव्हता, तो निश्चित मरत होता शंभरात फक्त दहाच कशीबशी वाचत होती. मरणारांना पुरण्यासाठी माणसे उरत नव्हती. घरातील सर्वच माणसं एकदम तापसरीच भक्ष्य होत होती. मग त्या घरात कोण मरण पावला हे पाहण्यासाठी ही कुणाला शुद्ध उरत नव्हती.272.

**संदर्भ ग्रंथ**


1. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वांग्मय ( कांदबरी खंड – १ ), प्रकाशक साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, प्रथम आवृत्ती, पुणे, १ मे २०१७.
2. जोगदंड किशोर, सोलापूर जिल्ह्यातील डाव्या चळवळीचा इतिहास (१९२० ते १९६४), अप्रकाशित पी. एचडी. प्रबंध, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, २०१७.
3. साठे अण्णा भाऊ, फकीरा, प्रकाशन सुरेश एजन्सी, पंचेचाळीसावी आवृत्ती, पुणे,२०१५.
4. गायकवाड आसारामसाठे (संपा.), लोकशाहीर तथा लोकलेखक अण्णाभाऊ संदर्भ ग्रंथ,झेप प्रकाशन, नाशिक, प्रथम आवृत्ती १९९६.